# कमला कॉलेजच्या ताराराणी ठरल्या भारी

कोल्हापूर : केवळ मुलींसाठीचे कॉलेज म्हणून ओळख असलेल्या कमला कॉलेजमध्ये मुलींनी पुन्हा एकदा उल्लेखनीय यश मिळवत ९५ टक्के गुणांसह गुणवत्तेची पताका फडकवत ठेवली आहे. विज्ञान शाखेचा ९८ टक्के, कला शाखेचा ९६ टक्के, तर वाणिज्य शाखेचा ९१ टक्के निकाल लागला आहे.

९० टक्के गुणांसह पूजा राजेंद्र रेडेकर ही वाणिज्य शाखेसह कॉलेजमध्येही पहिली आली आहे. विज्ञान शाखेत ८५ टक्के गुणांसह अनुष्का सुरेश कदम ही पहिली, तर ८१ टक्के गुणांसह आदिती अविनाश काटे ही कला शाखेतून पहिली आली आहे.

Scanned by CamScanner